ePaper

## पवार नास्तिक, अयोध्या दौऱ्यावरून केलेल्या टीकेला विजय शिवतारेंचं प्रत्युत्तर!



वर्ष - 6 । अंक - 351 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दि. 10 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- अवकाळी पावसाने पुणेकरांना झोडपले
- स्वच्छ आणि पारदर्शक कारभार!
- "शरद पवार नास्तिक आहेत, म्हणून..."

# पिंपरी विधानसभा वीर सावरकरमय!

## » पिंपरीत निघाली भव्य दिव्य 'वीर सावरकरांची गौरव यात्रा', नागरिकांनी केले पुष्पवृष्टीद्वारे स्वागत



।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत मातेसाठी बलिदान देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची गौरव यात्रा महाराष्ट्रातील प्रत्येक मतदारसंघात भाजपच्या वतीने व शिवसेनेला सोबत घेऊन मोठ्या उत्साहात निघत आहे, त्यातीलच एक भाग म्हणून पिंपरी विधानसभा क्षेत्रातही आज रविवार दिनांक 9 एप्रिल रोजी ही यात्रा सायंकाळी पाच वाजता आकुर्डी खंडोबा मंदिरापासून आकुर्डी गाव मार्गे दत्तवाडी विठ्ठल मंदिरा पर्यंत अत्यंत दिमाखात काढण्यात आली.**

भारत मातेचे पूजन करून यात्रेची सुरुवात शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, सदाशिव खाडे, अमर साबळे, एकनाथ पवार, अमित गोरखे, राजेश पिल्ले, मिलिंदजी देशपांडे, हेमंत हरहरे, नितीन वाटकर यांनी केली. या यात्रेसाठी वीर सावरकरांचा भव्य व अत्यंत देखणा रथ बनवण्यात आला होता.

वीर सावरकरांची गाणी वाजवत असलेला बँड यामुळे या रॅलीमध्ये वातावरण अत्यंत देश प्रेमी झाले होते. ढोल ताशा पथक त्याचबरोबर महिलांनी बांधलेले भगवे फेटे व पुरुषांनी घातलेल्या भगव्या फेट्या व उपर्णे यामुळे अत्यंत शिस्तबद्ध अशी भव्य दिव्य मिरवणूक आकुर्डी गावातून पहिल्यांदाच निघाली. व्यापारी मंडळींनी सावरकरांच्या रथावर ठिकठिकाणी थांबून पुष्पवृष्टी केली.

### सावरकर प्रेमी उत्साहात सहभागी

» यात्रा यशस्वी होण्यासाठी आमदार उमाताई खापरे, अमित गोरखे, सदाशिव खाडे, अनुप मोरे, केशव घोळवे, संदीप वाघेरे, माऊली थोरात, सुजाता पालांडे, कैलास कुटे, प्रमोद कुटे, उर्मिला काळभोर, सुप्रिया चांदगुडे, अमोल थोरात, माऊली थोरात, संजय मंगुडेकर, गणेश लंगोटे, समीर जावळकर, अतुल इनामदार, महेंद्र बाविस्कर, सोनाली हिंगे, अनुराधा गोरखे, संदीप वाघेरे, आर एस कुमार, गणेश ढाकणे, विशाल वाळूजकर, कोमल शिंदे, प्रदीप बेंद्रे, नंदू भोगले, विजय शिनकर, नगरसेवक शीतल शिंदे, सुरेश गदिया, रघुनाथ जवळकर, गोपाल केसवांनी, सावरकर गौरव यात्रा पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे यांनी सर्वांचे स्वागत केले. भाजपा सरचिटणीस राजू दुर्गे यांनी आभार मानले.

## जोरदार पावसात कोथरुडमध्ये चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सावरकर गौरव यात्रा उत्साहात!



काँग्रेस पक्षाचे नेते माजी खासदार राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या विधानाच्या निषेधार्थ, राज्यात भाजप आणि शिवसेना आक्रमक झाल्याच पाहण्यास मिळत आहे. त्याच दरम्यान भाजपकडून सावरकर गौरव यात्रेच ठिकठिकाणी आयोजन केले आहे. त्या पार्श्वभूमीवर कोथरूड भागात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली जोरदार पावसात सावरकर गौरव यात्रा पार पडली. यावेळी सावरकरजी के सम्मान में कोथरुडकर मैदान में, मैं भी सावरकर अशा घोषणा देण्यात आल्या.

या यात्रेत माजी आमदार मेधा कुलकर्णी, माजी महापौर भाजपा प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांच्यासह भाजपाचे आजी माजी पदाधिकारी सहभागी झाले होते. तर आजच्या दिवशी शहरातील अनेक भागात सावरकर गौरव यात्रा पार पडली आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या अनेक क्रांतिकारकांमुळे ब्रिटिशांना भारतातून जावं लागलं आहे. कॉंग्रेसचे नेते सातत्याने महापुरुषांचा अपमान करत असून विरोधकांचं महापुरुषांप्रतीचं प्रेम बेगडी आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान देशातील नागरिक कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. असा इशारा यावेळी त्यांनी विरोधकांना दिला.

# अवकाळी पावसाने पुणेकरांना झोडपले!

## विजांचा कडकडाट...मेघगर्जनेसह वाहणारा सोसाट्याचा वारा...

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विजांचा कडकडाट... मेघगर्जनेसह वाहणारा सोसाट्याचा वारा...अन् त्यात धो-धो पडणारा पाऊस... तर काही ठिकाणी गारा... रविवारची सुटीच्या निमित्ताने घराबाहेर पडलेल्या नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडाली. शहरात झालेल्या अवकाळी पावसाने पुणेकरांना चांगलेच झोडपले. मात्र सोमवारपासून (ता. १०) ही स्थिती काहीशी निवळेल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.**

गेल्या तीन दिवसांपासून शहरात ढगाळ वातावरण असून पावसाच्या हलक्या सरींची नोंद ही झाली. रविवारी (ता. ९) सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. त्यामुळे उकाडाही प्रचंड जाणवू लागला होता. दुपारनंतर मात्र जिल्ह्यावर ढगांची दाटी झाल्याचे उपग्रहाने टिपलेल्या छायाचित्रातून दिसून आले.

बघता-बघता पेठांसह उपनगरात धुव्वाधार पावसाला सुरवात झाली. त्यात कात्रज, खडकवासला, सिंहगड रस्त्यासह काही ठिकाणी गारा पडल्या. अवकाळी पावसाच्या या मुसळधार पावसाच्या सरींमुळे रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालकांना देखील कसरत करावी लागली. तर खरेदीसाठी तसेच चतुर्थीनिमित्त दर्शनाला आलेले नागरिक पावसात चांगलेच अडकले.

शहरात ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानात वाढ झाल्याने उकाडाही वाढला होता. त्यात अचानक झालेल्या या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा पसरल्याने उकाड्यापासून काही प्रमाणात सुटका झाली. असे असले तरी उद्यापासून (ता. १०) पावसाची शक्यता कमी असल्याचे हवामानशास्त्र विभागाने वर्तविले आहे.

### ...अन् बत्ती गुल!

विजांच्या कडकडाट, मेघगर्जनेसह शहरासह उपनगरांना वादळी पावसाच्या दमदार हजेरीमुळे अनेक भागात बत्ती गुल झाली होती. जोरदार पाऊस व चमकणाऱ्या विजा यातच विमाननगर, घोरपडी, वाघोली, कोथरूड, वडगाव धायरी व इतर भागात वीज पुरवठा खंडित झाला. त्यात बाहेर ही बरसणाऱ्या धुव्वाधार सरींमुळे दृश्यमानता ही कमी झाली होती. वाहतूक कोंडीवर ही याचा परिणाम झाला.





## केंद्र सरकारने दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीचा निर्णय घेतल्यास जेल भरो आंदोलनाचा इशारा- बांगर

।मंचर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

"केंद्र सरकारने दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीच्या हालचाली सुरू केल्या आहेत. आयातीचा निर्णय घेतल्यास दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडतील. दुर्दैवाने आयातीचा निर्णय झाल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून जेल भरो आंदोलन केले जाईल."असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंबेगाव तालुका अध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी दिला आहे.

पिंपळगाव-खडकी (ता. आंबेगाव) येथील श्रीराम दूध उत्पादक सहकारी संस्थेच्यासमोर रविवारी (ता.९) दुध उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून आंदोलन केले. यावेळी प्रभाकर बांगर बोलत होते. याप्रसंगी वनाजी बांगर, सतीश वाबळे, बाबाजी पोखरकर, सुभाष पोखरकर, संदीप बांगर ,संतोष पोखरकर, राहुल बांगर, ज्ञानेश्वर पोखरकर, रामदास बांगर ,नवनाथ पोखरकर, जनार्धन पोखरकर, कुंडलिक अरगडे उपस्थित होते.

प्रभाकर बांगर म्हणाले "कांद्यासह अन्य शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळत नाही. अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. मार्च अखेरीस अनेक शेतकऱ्यांना सहकारी संस्था व बँकांचे कर्जाचे हप्ते वेळेवर भरता आले नाहीत. दुध व्यवसायामुळे शेतकरी कुटुंबाना आधार मिळाला आहे.

# राज्यकर्त्यांनी ५० वर्षे पुढच्या विचाराने योजना आखाव्यात: अजित पवार!

## दक्षिण पुण्याच्या विकासात हा गृहप्रकल्प आणि व्यवसायिक संकुल भर टाकेल

।कात्रज । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यकर्ते कोणीही असले तरी त्यांना मतदार निवडून देतात. त्यामुळे राज्यकर्त्यांनी पुढची ५० वर्षांनी डोळ्यांसमोर ठेऊन काम करायला हवे आणि तशा प्रकारच्या योजना आखायला हव्यात. पुणे शैक्षणिक, माहिती तंत्रज्ञान आणि ऑटो क्षेत्रात खूप पुढे गेले आहे. पण, समस्याही वाढल्या असल्याचे मत विरोधीपक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केले. ते कात्रजमधील साईसंकल्प डेव्हलपर्सच्या एमबीएम ऑर्बिट, नंदनवन कोलिना या व्यावसायिक संकुल व गृहप्रकल्पाचा शुभारंभप्रसंगी बोलत होते.**

यावेळी माजी नगरसेवक युवराज बेलदरे यांनी प्रास्ताविकात हा प्रकल्प सर्व बाजूंनी कसा सोयीस्कर आहे याची माहिती दिली, तर दिपक माने यांनी या प्रकल्पाचे महत्व सांगताना, 'महत्वाच्या कंपन्यांना याठिकाणी जागा उपलब्ध होणार असून चांगल्या प्रतीचा प्रकल्प उभारण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

शांताराम धनकवडे, प्रकाश कुतवळ, ॲड. सुभाष मोहिते, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगांबर दुर्गाडे, प्रशांत जगताप, दत्तात्रय धनकववडे, सरस्वती शेंडगे, नंदकुमार बेलदरे, आनंता मोरे, संतोष माने, प्रकाश कदम यांची यावेळी उपस्थिती होती.

पवार म्हणाले, 'तीन मराठी माणसे एकत्र येऊन हा प्रकल्प साकारत आहेत. अशा पद्धतीने मराठी माणसाने कामे करत प्रगती करायला हवी. दक्षिण पुण्याच्या विकासात हा गृहप्रकल्प आणि व्यवसायिक संकुल भर टाकेल.

मोठी संकुले उभारत असताना कचऱ्याचा प्रश्न महत्वाचा असून त्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असून विकास करत असताना राज्यकर्त्यांसह प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात काम करताना नैतिक जबाबदारी स्विकारून पर्यावरणाची काळजी घ्यावी. जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतुकीचा वापर होण्यासाठी राज्यकर्त्यांनी सेवा पुरवाव्यात. मोठ्या शहरात कोयता गँग खूप सक्रिय झाल्या असून लवकर श्रीमंत होण्याच्या अपेक्षेतून हे घडत असताना राजकीय लोकही त्याला खतपाणी घालत आहेत.



### नियमानुसार बांधकाम हवे

धनकवडी परिसराचे उदाहरण देताना पवार यांनी एका खिडकीतून दुसऱ्याला हस्तांदोलन करता येत असल्याचे सांगत अशा प्रकारची बांधकामे व्हायला नकोत. अग्निशामक दल, रुग्णवाहिका पोहचण्यासाठी मोठी जागा सोडण्याची गरज असल्याचे म्हटले. त्याचबरोबर, यावेळी एकनिष्ठ कार्यकर्ते कमी झाले असून त्यांना न्याय मिळाला पाहिजे अशी भूमिका असल्याचेही सांगितले.

## शून्य थकबाकी असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिका सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचा

# स्वच्छ आणि पारदर्शक कारभार !

### » कर्मचारी महासंघ पॅनलचे प्रमुख शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांची माहिती



।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत मातेसाठी बलिदान देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची गौरव यात्रा महाराष्ट्रातील प्रत्येक मतदारसंघात भाजपच्या वतीने व शिवसेनेला सोबत घेऊन मोठ्या उत्साहात निघत आहे, त्यातीलच एक भाग म्हणून पिंपरी विधानसभा क्षेत्रातही आज रविवार दिनांक 9 एप्रिल रोजी ही यात्रा सायंकाळी पाच वाजता आकुर्डी खंडोबा मंदिरापासून आकुर्डी गाव मार्गे दत्तवाडी विठ्ठल मंदिरा पर्यंत अत्यंत दिमाखात काढण्यात आली.**

पिंपरी-चिंचवड महापालिका सेवकांची सहकारी पतसंस्थेचा कारभार सन 2005-2006 पासून माझ्या नेतृत्वाखाली सुरू आहे. सन 2005 पूर्वी पतसंस्थेत 65 टक्के थकबाकी होती. तसेच, बरेचसे कर्मचारी नोकरी सोडून गेले. सन 2005-2006 नंतर संस्था आमच्या ताब्यात आल्यानंतर सभासद, लेखा विभागाचे प्रमुख, महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करुन पतसंस्थेची थकबाकी 0.003 टक्के केली. थकबाकी शून्य करण्यात यश आले आहे, असे स्व. शंकर (आण्णा) गावडे कर्मचारी महासंघ पॅनलचे प्रमुख शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांनी रविवारी (दि.9) पत्रकार परिषदेत सांगितले.

पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेला पॅनल प्रमुख शशिकांत झिंजुर्डे, मनोज माछरे तसेच पॅनल मधील उमेदवार सनी कदम, संदीप कापसे, गणेश गवळी, वैभव देवकर, विजय नलावडे, कृष्णा पारगे, भास्कर फडतरे, अभिषेक फुगे, विशाल भुजबळ, चंद्रकांत भोईर, नाथा मातेरे, शिवाजी येळवंडे, योगेश रानवडे, विश्वनाथ लांडगे, विजया कांबळे चारुशीला जोशी, अनिल लखन, ज्ञानेश्वर शिंदे, विजय मुंडे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महापालिका सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या सन 2023-2028 या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी (दि.11) मतदान होत आहे. स्व. शंकर (आण्णा) गावडे कर्मचारी महासंघ पॅनल प्रमुख बबनराव झिंजुर्डे यांच्या नेतृत्वाखाली 19 उमेदवार कर्मचाऱ्यांच्या हितासाठी व सेवेसाठी निवडणुकीस सामोरे जात आहेत. बबनराव झिंजुर्डे यांनी सांगितले की, संस्थेचे कामकाज संगणकीकृत व स्वमालकीच्या 4 हजार चौरस फूटाच्या जागेत सुरू करण्यात आले आहे. सन 2006-7 व 2020-21 या आर्थिक वर्षामध्ये पतसंस्थेला तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आदर्श पतसंस्था पुरस्कार देवुन गौरव करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या वतीने सलग 4 वर्षे सर्वोत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल दिपस्तंभ पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

#### अफवाना सभासद भीक घालणार नाहीत

**» सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येतो. सलग 25 वर्षे पतसंस्थेचे सभासद असणाऱ्या कर्मचाऱ्यांना 5 हजार रूपयांची भेट स्वरुपात देण्यात येते. सभासदांना दिर्घमुदत कर्ज व तातडीचे कर्ज तात्काळ देण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील असते. संस्थेमध्ये मनुष्यबळ कमी असल्याने निवडणुकीनंतर तात्काळ नोकरभरती करुन कामकाज गतीशील करण्यात येणार आहे. भविष्यकाळात 20 लाखांपेक्षा जास्त कर्ज मर्यादा वाढविण्याचा मानस आहे. सभासदांना 15 टक्क्यांपर्यंत लाभांश देण्याचा प्रयत्न आहे. कर्जावरील व्याजदर कमी करण्यात येईल, असे झिंजुर्डे यांनी सांगितले. संस्थेचे कामकाज नियमानुसार सुरू आहे. विरोधक बिनबुडाचे आरोप करीत आहेत. त्या अफवाना सभासद भीक घालणार नाहीत, असे विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**

---

## उन्हाची तीव्रता वाढताच ऊर्जा देणाऱ्या रसाळ फळांना वाढली मागणी

### » उन्हापासून थंडावा देणारी रसदार फळे पिंपरी-चिंचवडच्या बाजारात दाखल



।पिंपरी-चिंचवड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उन्हाळ्याची चाहूल दिवसेंदिवस वाढतच आहे. नागरिक तहान आणि दाह शमविण्यासाठी गारवा निर्माण करणाऱ्या रसाळ फळांना प्राधान्य देत आहेत. परिणामी उन्हाळा सुरू होताच रसदार फळांना नागरिकांची मागणी वाढली असल्याची माहिती भोसरी, दिघी येथील फळविक्रेत्यांनी दिली.**

उन्हाची तीव्रता आता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे उन्हापासून थंडावा देणारी रसदार फळे बाजारात दाखल होऊ लागली आहेत. सध्या बाजारात सर्वाधिक आवक रसदार फळांची होत आहे. त्यामध्ये कलिंगड व खरबुजाची सर्वाधिक संख्या आहे. तसेच डाळिंब, द्राक्षे, चिकू, पपई, नारळ पाणी, अननस यांनादेखील मागणी आहे. मात्र, यंदाही या फळांच्या किमतीत 10 ते 20 टक्के वाढ झाली असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.निरोगी आरोग्यासाठी फळे खाण्यावर भर देण्यास आहारतज्ज्ञ सांगतात. शहराच्या मुख्य भागासह गल्लीबोळातून फळ विक्रेते हातगाडीवर फळे विकताना दिसत असून ग्राहकांचा त्यांना प्रतिसाद मिळत आहे. उन्हाच्या दिवसांत मोठ्या प्रमाणावर फळांची विक्री होत असते. उन्हाळ्याच्या तोंडावरच महागणारी रसदार फळे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशा दरात साध्या उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिक उन्हाळी फळांच्या खरेदीला प्राधान्य देत आहेत. शहरात ठिकठिकाणी फळांच्या हातगाड्यांवर फळ विक्री पहायला मिळत आहे.



#### फळांच्या रसाला नागरिकांची पसंती

**» विविध फळे खाण्यासह त्यांचा ज्यूस पिण्याकडेही नागरिकांचा कल वाढला आहे. त्यामुळे वर्षभर फळांचा रस आरोग्यास चांगला असून, तहानही भागवत असल्याने त्याला मोठी मागणी आहे. पावसाळा आणि थंडीच्या दिवसात फळांच्या रसाला फारशी मागणी नसली, तरी उन्हाळा सुरू होताच रसासह रसदार फळांची मागणी वाढलेली आहे. वर्षभर शहरात फळांच्या रसांची दुकाने दिसतात. मात्र, उन्हाळा सुरू होताच त्यांच्या संख्येत भर पडत आहे. या दुकानांमधूनही फळांना मोठी मागणी आहे. घरी फळे खाण्यासह ज्यूस सेंटरमध्ये विविध फळांचे रस पिण्याला नागरिक प्राधान्य देत आहेत.**

## संपादकीय »

# त्याला ‘रोजगार’, तिला ‘सुरक्षा’...!

***राज्यघटनेतील दुरुस्तीने महिलांना राजकारणात अवकाश मिळाला. स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षणाने त्या प्रतिनिधी बनल्या. तथापि, राजकीय पक्षांतील कामगिरीपासून ते विधिमंडळातील प्रवेशापर्यंत अनेक बाबतीत त्यांना अडथळे येत असल्याचे जाणवते. याला प्रामुख्याने सामाजिक, राजकीय धारणा कारणीभूत आहेत.***

निवडणुका जाहीर होतात. राजकीय पक्षांची मतदारांना आकर्षित करून घेण्याची लगबग सुरु होते. घोषणा होतात... आमचे सरकार युवकांना रोजगार देईल आणि महिलांना सुरक्षा... युवकांसाठी क्रिकेटचे सामने भरवले जातात. महिलांसाठी तीर्थयात्रा, साडीवाटप कार्यक्रम आणि हळदी कुंकू असे कार्यक्रम आयोजित केले जातात. राजकीय पक्षांची महिला मतदारांकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यांच्याप्रती नीती काय असे विचारल्यावर समोर येते ते हे चित्र. राजकीय पक्ष मतदारांच्या अपेक्षा, त्यांचे प्रश्न याचा अंदाज घेऊन त्यांची रणनीती ठरवतात, जाहीरनामे आखतात. अशावेळी ‘महिला मतदारवर्ग’ हा शब्द ऐकल्यावर राजकीय पक्षांच्या मते महिलांचे पुढीलप्रमाणे प्रश्न असावेत, असे वाटते.यामध्ये मुख्यत्वे, सुरक्षा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे न परवडणारे दर, स्वयंपाकाच्या गॅसची दरवाढ, धार्मिक यात्रा/पर्यटनाच्या मर्यादित संधी याचा समावेश होतो. त्यामुळे माता-आई-पत्नी या चौकटीला शोभेल अशा घोषणा करणे, प्रवास खर्चात सूट देणे, मोफत तीर्थयात्रा घडवून आणणे यावर सर्व राजकीय पक्षांचा भर असतो. अनेक अभ्यासक हे सांगतात की, महिलांनादेखील अन्न, वस्त्र, निवारा या गरजांबरोबरच आर्थिक संधींची उपलब्धता, रोजगार विषयक मेळावे, मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याबाबतचे प्रश्न, राजकारणातील संधी यामध्ये पुरुष मतदारांच्या इतकाच रस असतो. मात्र महिला मतदारांसाठी प्रतीकात्मक, संस्कारात्मक आणि भावनात्मक रणनीती आखणे हे निवडणुका जिंकण्याचे सोपे तंत्र बनून गेले आहे, असे राजकीय पक्षांना वाटते. याचे कारण राजकीय पक्षात असलेली महिला नेतृत्वाची पोकळी.

पक्षांच्या संघटनात्मक पातळ्यांवर महिला कार्यकर्त्यांसाठी ‘महिला आघाडी’ नामक स्वतंत्र चूल मांडून दिल्याने पक्ष महिलांबद्दल समानुभूती बाळगणारा बनत नाही.




# शरद वानखडे रुपी कार्यकर्त्याची श्रीमंती

कार्यकर्ता ही झपाट्याने दुर्मिळ होणारी प्रजाती बनली असताना जीवनाची चार दशके अजूनही कुणी स्वतःला कार्यकर्ता समजून तेही अंधश्रद्धा निर्मूलन सारख्या क्षेत्रात झोकून त्याच उत्साहाने काम करीत असेल हे जवळून अनुभवायचे असेल तर अकोल्यात शरद वानखडे याना भेटावे. सामाजिक कार्य म्हणजे " घरकी रोटी खाव और मामू की बकरी चराव " असे म्हटले जाते. हेच काम सतत केल्यावर अनेकांना लोकांचे वर्तन,अनुभव बघून चीड येते. बस झालं ! आणखी किती दिवस लोकांच्या सतरंज्या उचलायच्या ? असे वाटून त्याला नैराश्य सुद्धा गाठते मात्र सतत चाळीस वर्ष होऊनही कुणी याच कामात स्वतःला गुंतवून ठेवत असेल तर त्याने हाती घेतलेले कार्य किती मोठे असेल आणि त्याने कार्यकर्त्याचे संपूर्ण जीवनाचं कसे व्यापून टाकलेले असेल याची कल्पना येते. शरद वानखडे हा कुण्यातरी ध्येयाने जगणे झपाटून गेलेला हाडाचा कार्यकर्ता म्हणावा लागेल.

परवा शरद वानखडे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपमुख्य कार्यकारी पदावरून निवृत्त झाले. बँकेतला माणूस म्हटलं की अतिशय निरुत्साही आणि चेहऱ्यावरील माशीही उडू न देणारा टिपिकल कर्मचारी आपल्या डोळ्यापुढे उभा राहतो. शरद वानखडे याला अपवाद ठरलेला माणूस आहे. बँकेतील माणूस म्हटले की त्याच्या एवढे आर्थिक गणित इतर कुणालाही जुळवता येणार नाही ,थोडक्यात कसलातरी लाभांश पदरात पडल्याशिवाय तो जागेवरचा हलणार सुद्धा नाही मात्र बँकेत राहूनही सामाजिक तळमळीपोटी पैश्याला कधीही अनावश्यक किंमत न देणारा शरद सारखा कार्यकर्ता बघितला की अजूनही तत्वाच्या कठीण मार्गावर चालणारे असंख्य पाऊले भवताल टिकून आहेत याचा " हरीक " येते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम करणे म्हणजे दररोज घरावर गोटे घेण्याचे काम असते. आपलेच नातेवाईक ज्याला मानतात त्याच्या विरोधात भूमिका घेणे म्हणजे खायचे काम नाही.

१९८२ सालात नागपुरात प्रा. श्याम मानव यांनी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. त्याच काळात मानव सर लोकमत मध्ये " युवास्पंदन " नावाचा स्तंभ चालवत होते. त्याकाळात मानवांचा हा स्तंभ सर्वाधिक वाचला जायचा.मानव सर तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले होते , ८५-८६ त्यांच्या अकोला दौऱ्यात नितीन ओक,संजय चंदनगीर,अशोक घाटे असे अनेक तरुण जुळले त्यात शरद वानखडे यांचाही समावेश होता. या चार दशकांच्या काळात जग बदलण्याच्या उमेदीने ज्यांनी या कार्यात उड्या घेतल्या त्यातील अपवाद वगळता कुणीही बाजूला होऊ शकले नाही कारण या मेंदूमुक्तीच्या विचारात एवढे सामर्थ्य आहे की हा विचार पुढे चळवळीत आलेल्या कार्यकर्त्याचा जगण्याचा भाग बनतो. शरद वानखडे त्याला अपवाद नाहीत. चार दिवसांपूर्वी शरदाचा हॉटेल नैवैद्यम प्रांगणात सत्कार झाला.

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याची वैचारिक अन संपर्काची श्रीमंती काय असते याचे सुंदर दर्शन या सोहळ्यात घडले. आजच्या धावपळीच्या काळात श्रापासून आठदहा किमी अंतरावर कुणाच्या प्रेमापोटी हजारो लोकांनी जमणे हे दुर्मिळ दृश्य झाले आहे. परंतु शरद वानखडे यांनी गेल्या चार दशकात सामाजिक क्षेत्रात जे काही काम केले , लोकांची मदत केली .ऐन दिवाळीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या असंख्य कुटुंबाला भेटी दिल्या त्यांच्या घरात शिधा आणि गोडधोड पोहोचवले त्याचा हा परिणाम होत. ज्यांना थोड्याश्या कामाची भरपूर प्रसिद्धी घ्यायची असते असे असंख्य लोक आजच्या काळात न केलेल्या कामाचीही दवंडी पिटत असतात परंतु शरद वानखडे आणि प्रदीप गुरुखुद्दे या मित्रांनी राबवलेल्या अनेक रचनात्मक उपक्रमाचा ते साधा उल्लेखही करीत नाहीत याचा अर्थ त्यांची बांधिलकी नेमकी कशाशी आहे याची त्यांना उत्तम जाणीव आहे.

अंनिसचे काम करणे म्हणजे खिश्याला भुर्दंड, मानसिक त्रास आणि नातेवाईकांची नाराजी ओढवून घेणे असते. तुम्ही अंनिसचे काम करता हे एकदा लोकांना माहित पडले की पुढे लोकच तुम्हाला आराम करू देत नाहीत. कोणत्याही गावात भूत,भानामती,मंत्रतंत्र,जादूटोणा ,करणी,चमत्कार यापैकी काहीही असू दे ,अर्ध्या रात्री फोन करून लोक कार्यकर्त्याला साद घालतात. हे जणू माझेच व्यक्तिगत काम असल्याचे समजून कार्यकर्ता मिळेल त्या वाहनाने लोकांच्या मदतीला जातो.

# पावसाने फटकारले, सरकारनेही अव्हेरले द्राक्षाला!

**नाशिक जिल्हा द्राक्ष आणि कांद्याच्या उत्पादनात देशात आघाडीवर. इथले द्राक्ष सातासमुद्रापार गेले तसा कांदाही. पण अलीकडच्या काळात केंद्र सरकारच्या निर्यातीसंदर्भातील सततच्या धरसोड वृतीचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.**

यंदाही तो बांगलादेशाने वाढविलेल्या आयातशुल्कावरून बसला. त्याची झळ जिल्ह्यातील द्राक्षउत्पादकांना सोसावी लागत आहे. केंद्राची धोरणे सतत बदलत राहिली तर एकूणच आपल्या कृषिमालाच्या निर्यातीवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो हेही लक्षात घ्यायला हवे. परिणामी शेतकरी संकटाच्या गर्तेत लोटला जाणार आहे.

दुसरीकडे पावसाचे भाकीत आणि बदलती स्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनीही जागरूक राहून सामना करण्याची गरज आहे, अन्यथा एकाचवेळी बाजारात दोन्ही प्रकारची द्राक्षे बाजारात येऊन भाव पडण्यावर होईल. कृषी विभागानेही अटींचा बाऊ न करता निर्यातीला प्रोत्साहन द्यायला हवे. (SAPTARANG LATEST नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्याला नाशिकचा कॅलिफोर्निया म्हटले जाते. याचे कारण अर्थात येथील शेतीतील सुबत्ता आणि प्रयोगशील शेतकरींचे



त्यामागील श्रम आणि नियोजन आहे. यामुळेच जिल्ह्यातील द्राक्ष आणि कांद्याने देशभर आपले नाव कमविले आहे.

येथील कृषिमालाला देशभर मागणी असल्याने शेतकरी- व्यापारी आणि ग्राहक अशी साखळी निर्माण झाली आहे. या साखळीतील प्रत्येक घटकाचे महत्त्व असले तरी कालांतराने त्यात अनेक अपप्रवृत्तीही शिरल्या आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाला पाहिजे तशी किंमत मिळू नये यासाठीच प्रयत्न केले गेले.

शेतकरी त्याविरोधात वेळोवेळी आवाज उठवत राहिला. आता त्यात भर पडली आहे ती अनियमित, दीर्घकाळ चालणाऱ्या पावसाची अन निर्यातीसंदर्भातील केंद्र शासनाच्या धरसोड वृत्तीची.

यंदा जिल्ह्यात द्राक्षाची स्थिती तशी समाधानकारक होती. गेल्या तीन वर्षात चांगल्या पावसाने द्राक्षबागा बहरल्या होत्या, मात्र कोरोनाकाळाचा फटका द्राक्षालाही बसला. ती स्थिती यंदा निवळल्याने यंदा एकूण स्थिती उत्तम होती.

मात्र सप्टेंबरच्या मध्यापर्यंत लांबलेल्या पावसाने द्राक्षांच्या छाटणीला उशीर झाला. निर्यातक्षम (अर्ली) आणि लोकल अशा दोन्ही द्राक्षांच्या छाटण्या उशिरा झाल्याने बाजारपेठत दिवाळी आणि त्यानंतर असे अंतराअंतराने येणारे उत्पादन मात्र एकाचवेळी बाजारात आल्याने द्राक्षांचे बंपर उत्पादन झाले.

दुसरीकडे बांगलादेशाने नेमके याचवेळी आयातशुल्क वाढविल्याने व्यापाऱ्यांना जादा भुर्दंड बसल्याने त्यांनी कमी भावाने खरेदी करणे पसंत केले.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवार नास्तिक आहेत!

## अयोध्या दौऱ्यावरून केलेल्या टीकेला विजय शिवतारेंचं प्रत्युत्तर

।अयोध्या।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अयोध्या दौऱ्यावर गेले आहेत. मुख्यमंत्र्यांसह मंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्तेही अयोध्या दौऱ्यावर आहेत. या अयोध्या दौऱ्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी टीका केली. "अयोध्या दौरा हा श्रद्धेचा विषय असल्याचं सत्ताधाऱ्यांकडून सांगितलं जातंय. त्यांची श्रद्धा अयोध्येत आहे. आमची श्रद्धा शेतकऱ्यांवर आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीशी निगडीत आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी पुसत, त्यांना संकट काळात मदत कशी करता येईल? यावर आमची श्रद्धा आहे. प्रत्येकाचे धोरण वेगळे असू शकते," अशा शब्दांत शरद पवारांनी एकनाथ शिंदेंवर टीकास्र सोडलं.



### विरोधक हे विरोध करायचा म्हणून बोलतात

बंडखोर आमदारांनी जेव्हा बंडखोरी केली तेव्हा ते अयोध्येत जाऊन का बसले नाहीत? थेट गुवाहाटीला का गेले? बेइमानी केल्यानंतर त्यांना आता राम आठवतो का? या राऊतांच्या टीकेबद्दल विचारलं असता विजय शिवतारे पुढे म्हणाले, "खरं तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अयोध्येत राम मंदिराचं काम सुरू आहे. त्या कामाची पाहणी करणे. प्रभू श्रीरामाचे दर्शन घेणे, यासाठी आम्ही अयोध्येत आलो आहोत. मी जेव्हा मुख्यमंत्री बनेल, तेव्हा मी अयोध्येला जाईल, असा शब्द त्यांनी (एकनाथ शिंदे) आधीच दिला होता."

शरद पवारांच्या या विधानानंतर शिवसेना नेते विजय शिवतारे यांनी प्रतिक्रिया दिली. "शरद पवार हे नास्तिक आहेत. त्यामुळे त्यांच्या बोलण्यामागे हाच मुख्य हेतू आहे," अशा शब्दांत शिवतारे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

शरद पवारांच्या या विधानानंतर शिवसेना नेते विजय शिवतारे यांनी प्रतिक्रिया दिली. "शरद पवार हे नास्तिक आहेत. त्यामुळे त्यांच्या बोलण्यामागे हाच मुख्य हेतू आहे," अशा शब्दांत शिवतारे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. "राज्य संकटात असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अयोध्येत जाऊन बसले आहेत. शेतकऱ्यांना मदत करणं गरजेचं आहे" या शरद पवारांच्या विधानाबाबत विचारलं असता विजय शिवतारे म्हणाले, "शरद पवार हे नास्तिक आहेत. ते नास्तिक आहेत, हाच त्यांच्या बोलण्याचा हेतू आहे.

## शरद पवार महाविकास आघाडीतून बाहेर पडतील? चंद्रकांत पाटलांचे सूचक विधान



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी उद्योगपती गौतमी अदाणी यांच्याबद्दल केलेल्या विधानानंतर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. अदाणी उद्योग समूहाच्या कथित गैरकारभाची चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीपेक्षा ( जेपीसी ) सर्वोच्च न्यायालयाची समिती अधिक उपयुक्त आणि प्रभावी ठरेल, असं मत शरद पवारांनी मांडले होते.

यावर राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाष्य केले आहे. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. "शरद पवार अदाणींची चौकशी जेपीसीने नव्हे, तर न्यायालयाने करावी, असे म्हणत असतील, तर विरोधकांचे दात आणि नखे गळून पडतील," असा टोला चंद्रकांत पाटलांनी लगावला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "तीन पक्ष एकत्र येऊन लढले, तरी आमच्यासमोर आव्हान नाही. कारण, पुढील वर्षी लोकसभा नंतर सहा महिन्यांनी विधानसभा निवडणूक होणार आहे. तोपर्यंत हे सर्वजण एकत्र राहणे अशक्य आहे. एकत्र राहिले तरी, उमेदवारीवरून वाद होण्याची शक्यता आहे."

## महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा यशस्वी करण्याचे काँग्रेसपुढे आव्हान

।नागपूर।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

शिंदे-फडणवीस सरकारच्या धोरणाविरोधात महाविकास आघाडीची दुसरी सभा नागपूरमध्ये होत आहे. पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांमिळून ही सभा असणार आहे. या भागात मविआतील घटक पक्ष अनुक्रमे राष्ट्रवादी आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्या तुलनेत काँग्रेसची राजकीय शक्ती अधिक असल्याने सभा यशस्वी करण्याची जबाबदारी काँग्रेसचीच असल्याने ते पेलण्याचे मोठे आव्हान या पक्षापुढे आहे.

आगामी निवडणुकीची तयारी म्हणून महाविकास आघाडीने राज्यात विभागनिहाय संयुक्त सभा घेण्याचे ठरवले. छत्रपती संभाजीनगर येथील पहिली सभा यशस्वी झाली आहे. या सभेवर शिवसेनाचा (ठाकरे गट) प्रभाव अधिक दिसून आला. आता नागपुरात पूर्व विदर्भासाठी होत असलेल्या सभेसाठी काँग्रेसला अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. पूर्व विदर्भात काँग्रेसचे ९, राष्ट्रवादी काँग्रेसचे चार आमदार आहेत. शिवसेनेच्या ठाकरे गटाकडे पूर्व विदर्भात एकही आमदार नाही.

पूर्व विदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस नेते सुनील केदार आणि विजय वडेट्टीवार हे दिग्गज नेते आहेत. राष्ट्रवादीकडून अनिल देशमुख आहेत.




# काहींना हिंदुत्वाची ॲलर्जी!

## एकनाथ शिंदेंचा महाविकास आघाडीला टोला

। मुंबई ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अयोध्या दौऱ्यासाठी काल (शनिवारी) रात्री लखनौ विमानतळावर दाखल झाले. त्यानंतर आज (९ एप्रिल) त्यांनी अयोध्येत रामलल्लांचं दर्शन घेतलं. तसेच या दर्शनानंतर त्यांनी माध्यमांशी बातचित केली.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, काही लोकांना आमच्या या अयोध्या दौऱ्याची ॲलर्जी होती, अनेकांना या दौऱ्यामुळे त्रासही झाला. त्यांनी टीका केली. परंतु अयोध्या हा आमच्या आस्थेचा विषय आहे, हा आमच्या श्रद्धेचा आणि भावनेचा विषय आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या दौऱ्याचा काहींना त्रास झाला, कारण त्यांना हिंदुत्वाची ॲलर्जी आहे. हे लोक हिंदू धर्माबद्दल चुकीचा प्रचार करत होते. त्यांना वाटतं की, हिंदूत्व



जर सर्वांच्या घराघरात, मनामनात पोहोचलं तर त्यांची राजकीय दुकानं बंद होतील. या भितीमुळे हे लोक हिंदुत्वाला, हिंदू धर्माला विरोध करत आले आहेत .

एकनाथ शिंदे म्हणाले की, २०१४ मध्ये हिंदुत्वाचा विचार घेऊन आम्ही सरकार बनवलं. २०१९ लाही तेच होणार होतं. परंतु स्वार्थ आणि खुर्चीच्या लालसेपोटी त्यांनी (उद्धव ठाकरे) चुकीचं पाऊल उचललं. परंतु आठ महिन्यांपूर्वी आम्ही ती चूक सुधारली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर ज्या लोकांना लांब ठेवलं, त्यांच्यासोबतच यांनी सरकार बनवलं होतं. बाळासाहेबांच्या विचारांशी दगा केला. परंतु आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन ती चूक सुधारली. त्यानंतर प्रभू श्रीरामाच्या आशीर्वादाने आम्हाला धनुष्य मिळाला आणि शिवसेना हे नावही मिळालं.

# तिकीटवाटपात कॉंग्रेस-भाजपाकडून लिंगायत समाजाला मानाचे स्थान!

## » लिंगायत नेत्यांना तिकीट देण्यात चढाओढ



**। कर्नाटक महाईन्यूज ।**

**राहुल गांधी यांचे एक ट्वीट सध्या चर्चेत आले आहे. राहुल गांधी यांच्या ट्वीटमध्ये वर्ड पझल आहे. कॉंग्रेसला सोडचिठ्ठी देणाऱ्यांची नावे या पझलमध्ये आहेत. त्या सर्वांच्या नावातून अदानी नाव तयार होते, असे ट्विटमध्ये दाखवण्यात आले आहे.**

कर्नाटक राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा २९ मार्च रोजी निवडणूक आयोगाने केली. सत्ता मिळविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाने या वेळी त्यांच्यापासून दुरावलेल्या लिंगायत समाजाला आपल्या बाजूने वळविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी २२४ मतदारसंघ असलेल्या विधानसभेत लिंगायत समाजाच्या उमेदवारांना ५५ जागा देण्याचा प्रयत्न कॉंग्रेसकडून करण्यात येत आहे. लिंगायत समाज आजवर भाजपाच्या बाजूने झुकलेला दिसून आला आहे. कर्नाटकाच्या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या समाजाचा पाठिंबा मिळविण्यासाठी कॉंग्रेसकडूनही जोरदार हालचाली होताना दिसत आहेत.

कॉंग्रेसने विधानसभा उमेदवारांच्या दोन याद्या आतापर्यंत जाहीर केल्या आहेत. त्यांपैकी १२४ उमेदवारांची पहिली यादी २५ मार्च रोजी आणि ४२ उमेदवारांची दुसरी यादी ६ एप्रिल रोजी जाहीर केली. एकूण १६६ उमेदवारांची आतापर्यंत घोषणा झाली आहे. ज्यापैकी ४३ जण लिंगायत समाजातील आहेत. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसने लिंगायत समाजाच्या ४३ उमेदवारांना संधी दिली होती. तो आकडा आता दुसऱ्या यादीतच गाठण्यात आला आहे. पुढील यादीत लिंगायत समाजाच्या आणखी काही उमेदवारांना संधी दिली जाऊ शकते. भाजपामधील लिंगायत समाजाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांना या वेळच्या निवडणुकीपासून लांब ठेवण्यात आले आहे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावर त्यांचा दावा उरलेला नाही. यामुळे कदाचित लिंगायत समाजात नाराजी उमटू शकते, असा कयास कॉंग्रेसमधील लिंगायत समाजाच्या नेत्यांनी लावला आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी कॉंग्रेसकडून जास्तीत जास्त लिंगायत उमेदवारांना तिकिट देण्यात येत आहे. असे असले तरी कॉंग्रेसनेही मुख्यमंत्रीपदी लिंगायत समाजाचा चेहरा पुढे केलेला नाही.

कॉंग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष आणि लिंगायत समाजाचे नेते ईश्वर खंद्रे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, लिंगायत समाज हा कॉंग्रेससोबत आहे. समाजाच्या उमेदवारांना अधिकाधिक तिकिटे दिल्याचा निश्चितच निवडणुकीत लाभ होईल. लिंगायत समाजातील नेत्यांनीच कॉंग्रेसकडे अशी मागणी काही महिन्यांपूर्वी केली होती. त्यामुळेच पक्षाच्या पहिल्या दोन याद्यांमध्ये याबद्दलचे स्पष्ट चित्र दिसून आले. दुसरीकडे, १९९० पासून कर्नाटकमधील लिंगायत समाजाने भाजपाला आपला जवळचा पक्ष मानले आहे.

भाजपाने अद्याप एकही यादी प्रसिद्ध केलेली नाही. २०१८ च्या निवडणुकीत भाजपाने लिंगायत समाजाच्या ५५ उमेदवारांना तिकिट दिले होते. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने येडियुरप्पा यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविली होती. यात १०४ जागा जिंकून भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. लिंगायत समाजाच्या ५५ पैकी ४० उमेदवारांचा निवडणुकीत विजय झाला. तर कॉंग्रेसच्या ४३ उमेदवारांपैकी १७ उमेदवारांना विजय मिळविण्यात यश आले.

लिंगायत समाजासोबतच कॉंग्रेसने दुसऱ्या क्रमाकांचा प्रभावशाली गट असलेल्या वोक्कालिगा समाजावरही आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. आतापर्यंत १६६ पैकी समाजाच्या २९ उमेदवारांना तिकिट घोषित केले आहे. कर्नाटकमध्ये वोक्कालिगा हा लिंगायत यांच्या नंतरचा सर्वात मोठा समुदाय आहे. २०१८ च्या निवडणुकीत कॉंग्रेसने वोक्कालिगाच्या २९ उमेदवारांना तिकिट जाहीर केले होते. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डीके शिवकुमार हे स्वतः वोक्कालिगा समाजाचे प्रतिनिधित्व करतात. कॉंग्रेसचा मुख्यमंत्रीपदाचा प्रबळ दावेदार म्हणून शिवकुमार यांच्याकडे पाहिले जात आहे. पक्षाने निवडणुकीत विजय मिळविल्यास त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडू शकते.

कर्नाटकमध्ये अनुसूचित जातींच्या समूहाची लोकसंख्या १७

# भाजपाच्या पराभवासाठी विरोधक आघाडीच्या केंद्रस्थानी कॉंग्रेस असावी

## » राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांचे मोठे वक्तव्य

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**2024 लोकसभा निवडणुकीबाबत राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी मोठे वक्तव्य केले आहे. त्यांच्या मते पुढील निवडणुकीत भाजपाचा पराभव करण्यासाठी आघाडीच्या केंद्रस्थानी कॉंग्रेसने इतर राजकीय पक्षांसोबत आघाडी केली पाहिजे.**

2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा (भाजपा) (BJP) सामना करणाऱ्या कोणत्याही युतीच्या केंद्रस्थानी कॉंग्रेस पाहिजे, असे स्पष्ट मत सिब्बल यांनी रविवारी केले आहे. त्यांनी सांगितले की, मजबूत आघाडीसाठी सर्व विरोधी पक्षांनी



एकमेकांच्या विचारसरणीवर टीका करताना संवेदनशील राहिले पाहिजे. त्यामुळे भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला विरोध करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांना प्रथम एक समान व्यासपीठ शोधण्याचे आवाहन, सिब्बल यांनी केले आहे.

सिब्बल म्हणाले की, हे सामायिक व्यासपीठ त्यांचे नव्याने तयार झालेले 'न्याय' व्यासपीठ असू शकते, जे कोणत्याही अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी तयार करण्यात आले आहे. 2024 च्या विरोधी आघाडीच्या नेतृत्वाच्या प्रश्नाचे उत्तर या टप्प्यावर देण्याची गरज नाही. त्यांनी 2004 चे उदाहरण देताना सांगितले की, जेव्हा अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारला लोकसभा निवडणुकीनंतर सत्तेतून बाहेर फेकले गेले होते.

### मुद्दे कमी केले तर राजकीय पक्षांमध्ये मतभेद होतील

**» राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी गौतम अदानीबद्दल केलेल्या वक्तव्यावर बोलताना सिब्बल म्हणाले की, तुम्ही मुद्दे कमी केले तर राजकीय पक्षांमध्ये मतभेद होतील. शरद पवार यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पक्षांना वेगवेगळे विचार असायला हवेत. भारतातील क्रोनी कॅपिटलिझमच्या संदर्भात राहुल गांधींचा काही दृष्टिकोन असेल, तर मला वाटते शरद पवार यांनी क्रोनी कॅपिटलिझमशी संबंधित व्यासपीठाला विरोध करणार नाहीत. म्हणूनच आम्हाला या व्यापक व्यासपीठांची आवश्यकता आहे. ज्याच्या आधारे विरोधी पक्ष एकजूट असल्याची खात्री करू शकतो, असे कपिल सिब्बल यांनी सांगितले.**

# राजस्थानात पुन्हा मतभेद!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

### भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर पायलट यांचं गेहलोत यांना आव्हान



राजस्थान निवडणुकीपूर्वी सीएम अशोक गेहलोत आणि सचिन पायलट उघडपणे समोरासमोर आले आहेत. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून सचिन पायलट यांनी गेहलोत सरकारला कोंडीत पकडले असून 11 एप्रिल रोजी ते एक दिवसीय उपोषण करणार असल्याचे सांगितले आहे.

सरकारने भ्रष्टाचारावर कारवाई करावी, असे त्यांचे म्हणणे आहे. आपण भ्रष्टाचाराविरुद्ध कोणतीही कारवाई करत नाही, असे जनतेला वाटू नये, म्हणून उपोषण करणार असल्याचं पायलट यांनी नमूद केलं.

पायलट म्हणाले की, त्यांनी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांना पत्रही लिहिले आहे. निवडणुकीच्या वेळी जनतेला दिलेली आश्वासने पाळण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. निवडणुका डोक्यावर आहेत. आम्ही जे बोललो ते आम्ही करतो, हे जनतेने पाहावे. मात्र सीएम गेहलोत यांनी आपल्या पत्राला प्रतिसाद दिला नसल्याचे त्यांनी सांगितले.

पायलट म्हणाले की, राजस्थानमध्ये आम्ही तपास यंत्रणांचा वापर करत नाही किंवा त्यांचा गैरवापरही करत नाही. पण आमच्या बोलण्यात आणि वागण्यात काही फरक आहे असे आमचे कार्यकर्ते आणि जनतेला वाटू नये.

# सुपरहिट मालिकेतून तेजस्वी प्रकाश घेणार एग्झिट?

अभिनेत्री तेजस्वी प्रकाश ही हिंदी मनोरंजनसृष्टीतील एक आघाडीची अभिनेत्री मानली जाते. केली अनेक वर्ष विविध मालिकांमध्ये उत्तमोत्तम भूमिका साकारत ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. हिंदी टेलिव्हिजनवरील ती सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणून ओळखली जाते. आता तिच्याबद्दल एक मोठी माहिती समोर आली आहे.

'बिग बॉस १५'मध्ये तेजस्वी प्रकाश सहभागी झाली होती. तर या परवाच्या ट्रॉफीवरही तिनेच नाव कोरलं होतं. यानंतर तिला अनेक मालिकांच्या ऑफर्स आल्या. त्यातून तिने एकता कपूरची ऑफर स्वीकारली आणि गेले काही महिने ती तिच्या 'नागिन ६' या मालिकेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसत आहे. पण आता तिने या मालिकेतून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला आहे.गेल्या वर्षी 'नागिन ६' ही मालिका सुरू झाली. या मालिकेला प्रेक्षकांकडून खूप चांगला प्रतिसादही मिळत होता. पण गेल्या काही महिन्यात या मालिकेचा टीआरपी घसरल्यामुळे निर्मात्यांनी ही मालिकाच बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचं बोललं जात आहे. तर अभिनेत्री तेजस्वी प्रकाश देखील या मालिकेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिकेमध्ये दिसत असून ती या मालिकेतून एग्झिट घेणार आहे. या मालिकेच्या एका एपिसोडसाठी ती तब्बल २ लाख रुपये आकारते. पण अद्याप निर्मात्यांनी ही मालिका बंद होणार असल्याची अधिकृत घोषणा केलेली नाही.

एकता कपूरच्या 'नागिन ६'नंतर ती 'नागिन ७' ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे. एप्रिल महिन्यात ही मालिका सुरू होईल असं बोललं जात आहे. तर या मालिकेत प्रमुख भूमिकेसाठी एकताने अभिनेता गुलतेशम याला कास्ट केलं आहे. नुकतेच त्याने स्वतः त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक पोस्ट शेअर करत ही बातमी दिली. पण आता 'नागिन ६'मधून बाहेर पडल्यावर तेजस्वी 'नागिन ७'मध्ये दिसणार का, हे येत्या काही दिवसांमध्ये स्पष्ट होईल.



# जेव्हा 'गुमराह'च्या रिमेकवर एका ट्विटर युजरने उडवली खिल्ली, मृणाल ठाकूरने दिलं गोंडस उत्तर

अभिनेत्री मृणाल ठाकूर सध्या तिच्या 'गुमराह' चित्रपटामुळे चर्चेत आहे. जो 7 एप्रिल रोजी रिलीज झाला आहे. या चित्रपटात अभिनेत्री पहिल्यांदाच पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. अभिनेत्रीचा हा चित्रपट 'थडम' (2019) या तमिळ चित्रपटाचा रिमेक आहे, ज्यामध्ये अरुण विजय दिसला होता.

त्याचबरोबर ट्विटरवर यूजर्स चित्रपटाबद्दल वेगवेगळ्या प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. या चित्रपटाबद्दल एका यूजरने ट्विट केले की, 'मी हा चित्रपट पाहणार नाही', ज्याला मृणालने आता खूप सुंदर उत्तर दिले आहे.खरं तर, ट्विटरवर 'गुमराह'चे पुनरावलोकन करताना, वापरकर्ता म्हणाला, "आधीच 'थडम' पाहिला आहे, त्यामुळे हा चित्रपट बघण्यात इंट्रेस्ट नाही.." वापरकर्त्याला उत्तर देताना मृणाल ठाकूर म्हणाली, "माझ्या आणि आदित्य साठी बघा सर प्लिज... तर अभिनेत्रीच्या चाहत्यांना तिचा साधेपणा खूप आवडत आहे.

यावर कमेंट करताना एका यूजरने लिहिले - "सो स्वीट ऑफ यू,, आता मी ते नक्कीच बघेन." याशिवाय अभिनेत्रीचे अनेक चाहतेही ते 'सीता' चित्रपट पाहायला जाणार असल्याचे सांगत आहेत.

मृणाल ठाकूर व्यतिरिक्त 'गुमराह'मध्ये आदित्य रॉय कपूर आणि रोनित रॉय हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसत आहेत. या चित्रपटात रोनित एसपी झाला असून मृणालही पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. चित्रपटाची संपूर्ण कथा एका हत्येभोवती फिरते. तर आदित्य रॉय कपूर यात दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. प्रसिद्ध ट्रेड ॲनालिस्ट तरण आदर्श यांनी आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर 'गुमराह'चे ओपनिंग डे कलेक्शन शेअर केल्याची माहिती आहे. त्यानुसार हा चित्रपट पहिल्या दिवशी केवळ 1.10 कोटींची कमाई करू शकला आहे.



# अनेक चित्रपट अयशस्वी, पण तरीही स्वरा भास्कर आहे कोट्यवधींची मालकीण

बॉलीवूडमधील कायमच चर्चेत असणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे अभिनेत्री स्वरा भास्कर. स्वरा भास्करचा आज वाढदिवस आहे. स्वरा भास्कर तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे ओळखली जाते. ती अनेकदा लोकांसमोर आपले मत मांडताना दिसते. आतापर्यंत तिने जितके चित्रपट केले त्यांपैकी मोजकेच चित्रपट हिट ठरले. पण तिचे फॅन फॉलोइंग प्रचंड आहे. स्वराने तिच्या इतक्या वर्षांच्या बॉलीवूड कारकिर्दीत सर्वांचे लक्ष तर तिच्याकडे वेधलेच, पण त्याचबरोबर मोठी संपत्ती कमावली आहे.

९ एप्रिल १९८८ रोजी स्वराचा जन्म झाला. स्वराने तिच्या करिअरची सुरुवात छोट्या पडद्यापासून केली. तर त्यानंतर 'माधोलाल कीप वॉकिंग' या चित्रपटातून तिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. पण 'तनु वेड्स मनू' या चित्रपटातील तिने साकारलेल्या भूमिकेचे खूप कौतुक झाले आणि तिचे नशीब चमकले. स्वराने आतापर्यंत जवळपास २० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे, पण त्यांपैकी अनेक चित्रपट अयशस्वी ठरले आहेत. तसे जरी असले तरीही स्वरा कोट्यवधींची मालकीण आहे.स्वरा एका चित्रपटासाठी ४ ते ५ कोटी मानधन आकारते. तर याचबरोबर सोशल मीडिया प्रमोशन आणि ब्रॅण्ड एण्डॉर्समेंटमधूनही ती चांगलीच कमाई करते. दिल्ली आणि मुंबई येथे तिची स्वतःची घरे आहेत. तर अलीकडेच तिने तिच्या मुंबईच्या घराचे इंटिरियर करून घेतले. या इंटरियरसाठी तिने बराच पैसा खर्च केला. याचबरोबर तिच्या गाड्यांचे कलेक्शनही मोठे आहे. त्यात तिच्याकडे बीएमडब्ल्यू एक्स1 ही गाडीही आहे. या गाडीची किंमत जवळपास ४८ लाख आहेत. तर घरे, गाड्या, इन्वेस्टमेंट अशी संपूर्ण मिळून स्वराची संपूर्ण मालमत्ता ४० कोटी आहे.



स्वरा भास्कर हिने ६ जानेवारी रोजी समाजवादी पार्टीचा नेता असलेल्या फहाद अहमदबरोबर रजिस्टर लग्न केले. महिनाभर लग्नाची बातमी गुलदस्त्यात ठेवल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात त्यांनी त्यांचे लग्न झाले असल्याचे जाहीर केले. त्यानंतर मार्च महिन्यात तिने दिल्लीला तिच्या आजी-आजोबांच्या घरी हळद-मेहंदी असे लग्नापूर्वीचे कार्यक्रमही केले. या लग्नामुळे ती गेले काही दिवस खूप चर्चेत होती.

# रिंकू सिंगच्या पाच षटकाराच्या जोरावर केकेआरचा शानदार विजय!

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कोलकाता नाईट रायडर्सने रोमांचक सामन्यात गुजरात टायटन्सचा ३ गडी राखून पराभव केला. शेवटच्या षटकात कोलकाताला विजयासाठी २९ धावांची गरज होती. रिंकू सिंगने शेवटच्या षटकात पाच षटकार मारत संघाला विजय मिळवून दिला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २०५ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात केकेआरने शेवटच्या चेंडूवर लक्ष्य गाठले. संघाकडून रिंकू सिंगने २१ चेंडूत नाबाद ४८ धावा केल्या.

**व्यंकटेश अय्यर आणि नितीश राणा यांच्या भागीदारीने कोलकाताला सामन्यात परत आणले**

या सामन्यात २०५ धावांच्या धावसंख्येचा पाठलाग करताना कोलकाता नाईट रायडर्स संघाची सुरुवात चांगली झाली नाही आणि 20 धावांवर रहमानउल्ला गुरबाजच्या रूपाने संघाने पहिली विकेट गमावली. यानंतर, २८धावांवर, नारायण जगदीशनच्या रूपाने संघाला आणखी एक धक्का बसला, जो केवळ ६ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.




व्यंकटेश अय्यरने रिंकू सिंगच्या साथीने धावांचा वेग कायम ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोही ४० चेंडूत ८३ धावांची खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर गुजरात संघासाठी या सामन्यात कर्णधारपद भूषवणाऱ्या राशिद खानची अप्रतिम गोलंदाजी पाहायला मिळाली, ज्याने १७व्या षटकातील पहिल्या ३ चेंडूत सलग ३ बळी घेत सामना गुजरातकडे वळवण्याचे काम केले.

त्यानंतर रिंकूने लाँग ऑफच्या चौथ्या चेंडूला आणि पाचव्या चेंडूला लाँग ऑनला षटकार देऊन सामना पूर्णपणे कोलकात्याच्या दिशेने वळवला. शेवटच्या चेंडूवर केकेआरला विजयासाठी ४ धावांची गरज होती आणि हा चेंडू षटकारापर्यंत पोहोचवत संघाला रोमहर्षक विजय मिळवून देण्याचे काम रिंकू सिंगने केले.

### कोलकाताला रोमहर्षक विजय मिळवून दिला

**» या सामन्यात गुजरातचा संघ सहज सामना जिंकेल असे सर्वांना वाटत असताना, त्यावेळी रिंकू सिंगने १९व्या षटकातील शेवटच्या दोन चेंडूंवर चौकार आणि षटकार खेचून कोलकात्याच्या आशा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. यानंतर, २० व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर उमेश यादवने १धाव घेत रिंकूला स्ट्राइक दिली. रिंकूने दुसऱ्या चेंडूवर लाँग ऑफ आणि त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगवर षटकार खेचून सामना रोमांचक केला.**

---

# इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट : दिल्लीचा सलग तिसरा पराभव

## » जैस्वाल, बटलरच्या अर्धशतकांमुळे राजस्थान 57 धावांनी विजयी

। गुवाहाटी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जोस बटलर आणि यशस्वी जैस्वाल या सलामीवीरांच्या अर्धशतकांच्या बळावर राजस्थान रॉयल्सने शनिवारी दुपारच्या सत्रात झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर ५७ धावांनी मात केली. दिल्लीचा हा सलग तिसरा पराभव ठरला.

गुवाहाटी येथे झालेल्या या सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद १९९ अशी धावसंख्या उभारली. बटलरने ५१ चेंडूंत ७९ धावांची, तर डावखुऱ्या जैस्वालने ३१ चेंडूंत ६० धावांची खेळी केली. या दोघांनीही आपापल्या अर्धशतकांदरम्यान ११ चौकार व एक षटकार मारला.



प्रत्युत्तरात दिल्लीचा डाव २० षटकांत ९ बाद १४२ धावांवर मर्यादित राहिला. दिल्लीकडून कर्णधार डेव्हिड वॉर्नरने (५५ चेंडूंत ६५) एकाकी झुंज दिली. राजस्थानच्या यजुवेंद्र चहल (३/२७) व ट्रेंट बोल्ट (३/२९) यांनी प्रभावी मारा केला.टेकले.या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यावर राजस्थानने सुरुवातीपासून आक्रमक शैलीत खेळ केला. मुंबईकर जैस्वाल आणि बटलर यांनी 'पॉवर-प्ले'च्या सहा षटकांत ६८ धावा केल्या. जैस्वालने २५ चेंडूंत, तर बटलरने ३२ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. या दोघांनी ८.३ षटकांतच ९८ धावांची सलामी दिल्यावर जैस्वालला मुकेश कुमारने बाद केले. पुढील षटकात 'चायनामन' फिरकीपटू कुलदीप यादवने राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनला माघारी पाठवले. सॅमसनला खातेही उघडता आले नाही. रियान परागही (७) फार काळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही. एका बाजूने गडी बाद होत असताना बटलरने फटकेबाजी सुरू ठेवली; परंतु ७९ धावांवर त्याला मुकेश कुमारने बाद केले. मग डावखुऱ्या शिमरॉन हेटमारने २१ चेंडूंत ३९ धावा फटकावल्यामुळे राजस्थानला २०० धावांसमीप पोहोचता आले.

धावांचा पाठलाग करताना दिल्लीच्या डावाची सुरुवात अडखळती झाली. डावखुरा वेगवान गोलंदाज बोल्टने पहिल्याच षटकात पृथ्वी शॉ आणि मनीष पांडे यांना खातेही न उघडता बाद केले. रायली रुसो केवळ १४ धावा करून माघारी परतला.

यानंतर वॉर्नर आणि ललित यादव (२४ चेंडूंत ३८) यांनी दिल्लीचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ६४ धावांची भागीदारी रचली. त्या वेळी सॅमसनने पुन्हा चेंडू बोल्टकडे सोपवला आणि त्याने ललितला बाद करत ही जोडी फोडली. यानंतर चहलच्या फिरकीपुढे दिल्लीची तळाची फळी ढेपाळली. वॉर्नरला इतरांची साथ न मिळाल्याने दिल्लीला १४२ धावांपर्यंतच पोहोचता आले.

**संक्षिप्त धावफलक**

**राजस्थान रॉयल्स : २० षटकांत ४ बाद १९९ (जोस बटलर**

---

## ऑरलिन्स मास्टर्स बॅडिमटन स्पर्धा
# प्रियांशू राजावत अंतिम फेरीत

। ऑरलिन्स (फ्रान्स) ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



भारताच्या प्रियांशू राजावतने ऑरलिन्स मास्टर्स बॅडिमटन स्पर्धेतील आपली सनसनाटी आगेकूच शनिवारीही कायम राखली. आर्यलडच्या एन्हत एन्गुएनचा पराभव करून प्रियांशने पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीच्या लढतीत प्रियांशूने जागतिक क्रमवारीत ३५व्या स्थानावर असणाऱ्या एन्गुएनचे आव्हान २१-१२, २१-९ असे सहज परतवून लावले. प्रियांशू यापूर्वी भारताच्या थॉमस चषक विजेत्या संघातील खेळाडू असून, या वर्षीचा राष्ट्रीय उपविजेता आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रियांशूने प्रथमच एखाद्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली.

नेटवरील खेळ आणि ताकदवान परतीचे फटके हे प्रियांशूच्या खेळाचे वैशिष्ट्य ठरले. प्रियांशूने आपल्या परिपूर्ण खेळाने एन्गुएनच्या फोरहॅण्ड फटक्यांना शिताफीने उत्तर देत लढतीवर कमालीचे नियंत्रण राखले. प्रियांशूचे सरळ येणारे ड्राइव्ह्ज आणि क्रॉस कोर्ट फ्लिक एन्गुएनला समजलेच नाहीत. त्यामुळे एन्गुएनकडून कमालीच्या चुका झाल्या.पहिल्या गेमला मिळालेल्या थोड्या फार प्रतिकारानंतरही प्रियांशूने ११-९ अशी आघाडी घेतली होती. गेमच्या मध्यानंतरही प्रियांशूने आपली आघाडी १७-११ अशी कायम राखली होती. त्यानंतर प्रियांशूने एन्गुएनला पहिल्या गेमला केवळ एक गुण मिळवून दिला. दुसऱ्या गेमला तर, प्रियांशूचा झंझावात रोखताना एन्गुएनची दमछाक झाली.कमालीच्या ताकदीने खेळत असताना प्रियांशूने ११-३ अशी मोठी आघाडी मिळवली होती. प्रियांशूच्या ताकदवान आणि वेगवान बॅकहॅण्ड फटक्यांपुढे एन्गुएन दुसऱ्या फेरीत पूर्णपणे निरुत्तर झाला होता. प्रियांशूच्या १८-३ अशा मोठ्या आघाडीनंतर एन्गुएनला तीन मॅच पॉइंट वाचवल्याचे समाधान मिळाले.